स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

कोविड -१९ चा बुलढाणा जिल्ह्यातील बचतगटांवरील परिणामांचा अभ्यास

मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा.

संशोधक

नालंदा जंगलीमन वाकोडे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख,

बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

''कोविड-१९ चा बुलढाणा जिल्ह्यातील बचतगटांवरील परिणामांचा अभ्यास''

प्रस्तावना :

आजचे युग हे आधुनिक युग आहे. विज्ञानाच्या बळावर मानव हा नव नविन गोष्टींचा शोध लावत असला तरी जगाला थांबवणारा एक महाभयंकर रोग आला आणि तो होता कोरोना म्हणजेच कोविड-१९ ज्याने माणसांची झोप उडवली होती. जगात सर्वात मोठी लोकसंख्या असलेल्या चीनमध्ये कोरोनाचा उद्रेक झाला तो २०१९ मध्ये भारतात या रोगाची सुरूवात ९ मार्च २०२० रोजी सुरू झाली. या दिवशी भारताच्या महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणूच्या प्रादूर्भावामुळे होणाऱ्या साथीच्या आजाराची पहिली नोंद झाली. १७ मार्च २०२० रोजी महाराष्ट्रात पहिल्या कोरोनाबाधित व्यक्तीच्या मृत्यूची नोंद झाली. महाराष्ट्र हे देशातील कोरोनाचा सर्वाधिक प्रभाव झालेले राज्य आहे. कोरोना हा संसर्गजन्य असल्याकारणाने तो झपाट्याने वाढत होता. परिणामी सरकारला मार्च २०२० ला लॉकडाऊन करावे लागले. लॉकडाऊन सुरू झाल्याने मानवी जीवनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. हातावर काम करणारे कामगार, मजूरवर्ग, व्यापारी, धंदे, बचतगट अशा सर्वांच्या जीवावर कोरोना उठला होता. काहिंना यात जीवही गमवावा लागला. अनेकांच्या डोक्यावरचे छत गेले. असा हा भयंकर रूप धारण करून आलेल्या कोरोना होता.

भारतासारख्या विकसनशील देशात शेती क्षेत्र प्राथमिक क्षेत्र आहे. ग्रामीण भागातील बहुतांशी लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. या शेतीतून मिळणारे उत्पन्न अनिश्चित आहे. कमी उत्पन्नामुळे या ग्रामीण भागातील लोकांना आपल्या गरजा भागविण्यासाठी रोजचा संघर्ष करावा लागतो. कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी घरातील पुरूष व महिला सतत प्रयत्नशील असतात.

घरकामाबरोबरच शेतमजूरी, धुणीभांडी इ. कामाद्वारे कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्याचा प्रयत्न या महिला करतात. ग्रामीण भागातील लोकांना उत्पन्न आणि खर्चातील ताळमेळ घालण्यासाठी काही घटकांचा आधार घ्यावा लागतो. कमी उत्पन्न पातळीत अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजा भागविणे कठीण जाते. उत्पन्न व खर्च यात तूट निर्माण होते ही तूट भरून काढण्यासाठी कर्ज घ्यावी लागतात. दारिद्रयात जीवन जगणाऱ्या लोकांची कर्ज अनुत्पादक असतात. अशा कर्जातून उत्पन्नात भर पडत नाही. अशी अनुत्पादक कर्जे सावकार, सोनार, दलाल यांच्याकडून घेतली जातात. ही मंडळी स्थानिक असल्यामुळे गरीब जनतेला घरबसल्या अंगठा घेऊन कर्ज देतात. अशा सावकारांना गावातील इतंभूत माहिती असल्यामुळे कर्ज सहज व दामदुप्पट व्याजाने देतात. सावकारी कर्जात भरमसाठ व्याज आकारणी, आगाऊ कपाती, हिशोबातील घोटाळे, वेठबिगारी असे दोष असले तरी ग्रामीण भागातील लोकांवर सावकारी कर्जाचा पगडा आहे. ग्रामीण समाजाची सावकारी पाशातून मुक्तता व्हावी याकरिता भारतात १९०४ साली लोकशाही प्रणालीवर आधारित सहकार चळवळ सुरू करण्यात आली. १९०६ ते १९११ या काळात बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ म्हैसूर या बँका भारतात नावारूपास आल्या. त्यानंतर १९१३ ते १९१७ या काळात ८७ बँका बुडाल्या. १९१७ नंतर भारतात बँकांच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण झाले. १९१८ मध्ये टाटा इंडस्ट्रिअल बँक या औद्योगीक बँकेची स्थापना करण्यात आली. १९२३ मध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडियामध्ये या बँकेचे विलीनीकरण करण्यात आले. १९४२ पर्यंत बँक विकासाचा वेग हा मंद होता. त्यानंतरच्या काळात बँकांच्या संख्येत वाढ होऊ लागली. देशातील बँक व्यवसायाच्या सुयोग्य वाढीसाठी व बँकांच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी १९४९ मध्ये भारतात बँक नियमन कायदा केला गेला. बँक प्रक्रियेतील दोष दूर

करण्यासाठी व बँकांची संघटित वाढ होण्यासाठी हा कायदा संमत करण्यात आला. १४ डिसेंबर १९६७ रोजी व्यापारी बँकांवर सामाजिक नियंत्रण लादण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. १९ जुलै १९६९ मध्ये १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करून व्यापारी बँकांचे जाळे ग्रामीण भागात पसरविण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु बँक कर्ज उभारणीच्या अवघड प्रक्रियेमुळे ग्रामीण भागातील बहुसंख्य लोक या वित्तीय सेवांच्या लाभापासून वंचित राहिलेले दिसून आले.

भारत हा खेड्यांचा देश आहे. ग्रामीण सुधारणा होणे म्हणजेच देशाची प्रगती होणे आवश्यक आहे. खेड्यांच्या म्हणजेच पर्यायाने देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक संपन्नता अत्यंत महत्त्वाची आहे. बचत गटांच्या उपक्रमांमुळे महिलांना बचत करण्याची, त्या बचतीचा योग्य वापर करण्याची, तसेच आर्थिक नियोजन व हिशोब करण्याची क्षमता प्राप्त होऊ शकते. महिला जेव्हा आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील, तेव्हाच त्या सर्व क्षेत्रात आत्मविश्वासाने वावरून कुटूंब, समाज व राष्ट्राला पुढे नेऊ शकतील.

नियोजनाच्या सुरूवातीपासून भारतात दारिद्रय निर्मूलन व रोजगार निर्मितीसाठी विविध योजना राबविल्या गेल्या. त्या सर्व योजनांचा समावेश १ एप्रिल १९९९ मध्ये सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेत करण्यात आला. भारतात महिला बचत गटांची सुरूवात १९८८ पासून मोठ्या प्रमाणात झालेली आढळते सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत महिलांबरोबरच पुरूषांचे तसेच मिश्र बचतगटही सुरू करण्यात आलेले आहेत. बचत गटाला एकमेकांना मदत करणारा, लोकांचा परस्पर मदत व परस्पर सहाय्य गट, शेजार गट किंवा स्वयं सहाय्यता गट म्हणून देखील ओळखले जाते. बचतगट संकल्पना विभिन्न लोकांच्या समुदायासंदर्भात वर्णन करण्यासाठी वापरली जाते. हा गरीब लोकांचा

गट आहे. ज्यामध्ये सदस्य गरिबी निवारण करण्यासाठी ऐच्छिकरित्या संघटीत होतात. ते एकमेकांना सहाय्य करतात तसेच अनुभव व माहितीची देवाणघेवाण आणि स्वतःचे जीवनमान उंचविण्यासाठी एकत्रित कार्य करतात. गटातील सभासद आपल्या नेहमीच्या समस्या, अडचणी व आजाराविषयी एकमेकांशी चर्चा करतात व शक्य असेल त्याप्रमाणे समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतात.

भारतात लोकशाही शासनप्रणाली अस्तित्वात आहे. लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही राज्य होय. त्याचप्रमाणे लोकांनी, लोकांसाठी सुरू केलेले गट म्हणजेच स्वयंसहाय्यता गट होय. बचतगट ही संकल्पना गांधीवादी सर्वोदयाचे सार आहे. या संकल्पनेत 'एकमेकांना सहाय्य करून अवघे धरू सुपंथ' ही सहकारातील उक्ती अनुभवास येते व खऱ्या सहकार प्रवृत्तीचे दर्शन घडते. बचत गटात समान आर्थिक स्तरातील महिला एकत्र येऊन आपल्या अडचणीच्या वेळी एकमेकींना आपल्याच सामुहिक बचतीतून निधी निर्माण करून कर्ज रूपाने परस्परांना मदत करतात.

स्त्रियांमधील बचत प्रवृत्तीचा व उपलब्ध साधनसामुग्रीचा कमाल वापर करून व त्याचे योग्य प्रकारे नियोजन करून त्यांच्यातील मूलभूत गुणांना पुरेपुर वाव देण्याचे एकमेव साधन म्हणजे महिला बचतगट होय. मौद्रिक अभिसरणाच्च्या निमित्ताने समूहात एकत्र येऊन सामुदायिक बुध्दिमत्तेच्या वापरातून विविध प्रश्नांची विवेकपूर्ण सोडवणूक करणाऱ्यांना नामी संधी देणारा मंच म्हणजे बचतगट होय. ग्रामीण भागातील निर्धन, गरीब आणि विशेषतः महिलांना काटकसर करून बचतीची सवय लावणे, सामूहिक बचतीच्या निधीतून कर्ज घेऊन तातडीच्या गरजा भागविणे व कर्जाद्वारे विकास साधण्यासाठी त्यांच्यात शिस्त रूजविणे, गटांना बँकांशी संलग्न करणे अशा नियोजन पध्दतीने गरीबांचा विकास साधण्याचे महत्वाचे साधन म्हणजे स्वंयसहाय्यता समूह होय.

सभासदांना आर्थिक लाभ मिळावा या उद्देशाने स्थापन करण्यात आलेली व समूह भावनेतून आणि आपुलकीतून निर्माण झालेली एक छोटी अनौपचारीक संस्था म्हणजे स्वयंसहाय्यता गट होय. परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे तेथून परस्परावलंबनाकडे वाटचाल करणारी अनौपचारिक संघटना म्हणजे बचतगट होय. व्यक्ती-कुटुंब-गट व समाज यांच्या परिवर्तन व विकासाचे सामुदायिक प्रयत्न करणारा चमू म्हणजे बचतगट होय. बचतगटात समान आर्थिक, सामाजिक स्थितीतील १० ते २० महिला व पुरूष एकत्र येतात. दरमहा २० रू. पासून १०० ते १५० रू. पर्यंत ठराविक रक्कम बचत म्हणून एकत्र जमा करतात. साधारणपणे सहा महिन्यातही बचतीची रक्कम त्यातून कर्ज देण्याइतपत मोठी होते. त्यामधून गटातील सभासदांना त्यांच्या गरजेनुसार कर्ज दिले जाते. गावातील सभासदांच्या सामाजिक आणि आर्थिक गरजा समान असलेल्या आढळतात.

बचतगट हा आर्थिकदृष्ट्या समान व जवळचा संबंध असणाऱ्या गरीब लोकांचा गट आहे. ज्यामध्ये नियमित लहान रक्कम बचत करण्यासाठी ते ऐच्छिकरित्या एकत्र आलेले असतात व अशी रक्कम सामान्य निधी म्हणून ठेवली जाते व जिचा उपयोग सभासदांच्या अत्यावश्यक गरजा भागविण्यासाठी व गटाने ठरविल्यानुसार मोफत दुय्यम कर्ज पुरवठ्यासाठी केला जातो.

बचतगटातील सभासदांना गरजेनुसार व आपत्कालीन कर्ज उपलब्ध होते. गटामुळे सभासदांचे अनौपचारिक स्त्रोतांकडून घ्याव्या लागणाऱ्या कर्जावरील अवलंबित्व हळूहळू कमी होते. स्वयंसाहाय्यता गटाच्या कामास नैतिकतेची बैठक असल्याने सद्‌गुण, सदाचार यांचा विकास होतो. गटांच्या सांघिक शक्तीमुळे सरकारी योजनांचा फायदा घेता येतो. गटाचे व्यवस्थापन कौशल्य वाढीस लागते. ग्रामीण भागात महिलांच्या सक्रिय सहभागामुळे स्वयंसहायता बचतगटांची चळवळ जोमाने वाढत आहे. महिलांच्या निराशावादी जीवनाला आशेचा किरण

देणारा बचतगट हा एक महत्वाचा घटक बनला आहे. विशेषतः ग्रामीण भागातील अशिक्षित, असंघटीत, रूढीपरंपरेच्या जोखडाने बांधल्या गेलेल्या महिलांना मुक्त करण्याची शक्ती बचतगटामध्ये असलेली दिसून येते. बचतगटामुळे अर्थोत्पादनाच्या कामाला चालना मिळत असून आर्थिक प्राप्तीतून रोजगार निर्माण होत आहे. ग्रामीण बँकेचा प्रकल्प हा महिलांना स्वातंत्र्याची फळे देणारा प्रकल्प आहे. महिलांमधील बचत प्रवृत्तीला उभारी देण्याचे कार्य आज अनेक गटांच्या माध्यमातून पार पाडले जात आहे. ग्रामीण भागातील उपलब्ध साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करणे बचतगटामुळे शक्य आहे.

संशोधन अभ्यासाचे महत्त्व :

भारतात नियोजनाच्या सुरूवातीपासून दारिद्रय निमूर्लन व महिला सबलीकरणासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. देशातील गरीबांचा विकास साधणे, त्यांना दारिद्रयरेषेच्या वर आणणे महत्वाचे आहे. बचतगटाच्या माध्यमातून दारिद्रय निमूर्लन व महिला सबलीकरण ही उद्दिष्टे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आज जगातील विविध देशात बचतगट मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. भारतात आंध्रप्रदेश, राजस्थान या राज्यात बचतगटांची सुरूवात झाली व त्यानंतर महाराष्ट्रात देखील बचतगट सुरू करण्यात आले. आज महाराष्ट्रात तीन लाखापर्यत बचतगट आहेत. या संख्येत अजून वाढ होत आहे. बचत गटांमुळे महिलांच्या व पुरूषांच्या बचतीत व कर्जउभारणीत वाढ होत आहे. महिला सामाजिकदृष्ट्या सबल होऊन स्वतःचा व्यक्तिमत्व विकास साधत आहेत, असे असले तरी बचत गट हा महिला सबलीकरणाचा प्रमुख मार्ग आहे का? हे अभ्यासणे गरजेचे आहे. तसेच महिलांचे जीवनमान उंचावण्यात बचत गटांची मदत होते का? ते पाहणे देखील गरजेचे आहे.

या संशोधन अभ्यासात कोविड-१९ चा महिला व पुरूष बचत गटांच्या कामकाज पद्धतीतील वेगळेपणा तसेच त्यांना येणाऱ्या समस्यांमधील व निधीच्या वापरातील फरकाचा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच हा अभ्यास महिला व पुरूष बचत गटांची बलस्थाने, कमकुवत बाजू, भविष्यातील संधी व समस्या कोणत्या आहेत? याचा अभ्यास करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात महिला व पुरूष बचत गटांसंदर्भात अनेक अभ्यास करण्यात आलेले असले तरी बुलढाणा जिल्ह्यातील महिला व पुरूष बचत गटांवर कोविड-१९ चा झालेल्या परिणामांचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) बचत गटांच्या पूर्व इतिहासाचा अभ्यास करणे.

२) बचतगटांच्या सभासदांचा सामाजिक-आर्थिक अभ्यास करणे.

३) बचतगटांच्या सभासदांच्या बचत आणि कर्जाचा अभ्यास करणे.

४) बचतगटांकडून राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा अभ्यास करणे.

५) बचतगटांना कोविड-१९ च्या काळात आलेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

संशोधनाची पद्धती :

प्रस्तुत संशोधनामध्ये सांख्यिकीय विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात येणार असून यामध्ये आधारसामग्रीचे स्त्रोत, नमुना निवड तसेच आधारसामग्री जमा करण्याची पद्धती आणि त्या आधारसामग्रीचे सांख्यिकीय विश्लेषण इत्यादी बाबींचे विवेचन करण्यात आलेले आहे.

संशोधनाची मर्यादा :

या अभ्यासासाठी महाराष्ट्रातील कोविड-१९ च्या काळातील बुलढाणा जिल्हयातील निवडक महिला बचत व पुरूष गटांची निवड करून त्याचा अभ्यास

करण्यात येणार आहे. त्यामुळे सदरील संशोधनाच्या मर्यादा या बुलढाणा जिल्ह्यापुरत्या मर्यादीत असणार आहेत.

संशोधन विषयाचे गृहीतके

१) बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक विकास साधण्याच्या ऐतिहासिक नोंदी आहेत.

२) बचत गटांच्याद्वारे महिलांनी व पुरूषांनी पुढाकार घेऊन सामाजिक व आर्थिक बदल घडविले आहेत.

३) बचत गटाच्या माध्यमातून प्रशिक्षण व कार्यशाळेद्वारे कौशल्य विकास वाढीस प्रोत्साहन मिळते.

४) महिलांमध्ये व पुरूषांमध्ये बचत गटाद्वारे उपजिविकेची संधी आणि निर्णय घेण्याची क्षमता निर्माण झाली आहे.

५) बचत गटाच्या माध्यमातुन आर्थिक सेवा आणि उत्पन्न देणारे उपक्रम राबवून गरिबी हटविण्यास मदत झाली आहे.

संशोधन साहित्याचा आढावा

या अभ्यासासाठी महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील कोविड-19 च्या काळातील महिला व पुरूष बचत गटांची निवड करण्यात येणार असून त्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

आधारसामग्रीचा प्रकार आणि आधारसामग्री जमा करण्याचे तंत्र :

प्राथमिक आधारसामुग्रीचे स्त्रोत :

अभ्यासाकरीता आवश्यक असणारी प्राथमिक स्वरूपाची आधारसामग्री शासकीय आणि विविध स्वयंसेवी संस्थांनी सुरू केलेल्या बचत गटांमधील महिलांकडून जमा केलेली आहे. ही आधारसामग्री जमा करण्यासाठी संरचित

अनुसूचीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच वैयक्तिक व सामुहिक मुलाखतीचादेखील वापर करण्यात येणार आहे.

दुय्यम आधारसामुग्रीचे स्त्रोत :

अभ्यासाकरीता आवश्यक असणारी दुय्यम स्वरूपाची आधारसामग्री ही वृत्तपत्रके, विविध संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख, रिझर्व्ह बँक प्रकाशने, भारताची आर्थिक सर्वेक्षणे, सांख्यिकीय विभागाकडील माहिती, केंद्र आणि राज्य सरकारचे विविध अहवाल, जनगणना आणि विविध संकेत स्थळे इ. स्त्रोतापासून संकलित करण्यात येणार आहे.

नमुना निवड :

अभ्यासासाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. बुलढाण्या जिल्ह्यातील निवडक बचत गटांची निवड करण्यात येणार आहे. या ५० बचतगटातील एकूण ५०० प्रतिसादकांकडून माहिती संकलित करण्यात येणार आहे.

आधारसामग्रीचे विश्लेषण :

संकलित आधारसामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी वर्गीकरण, सारणीयन, टक्केवारी व वारंवारीता या सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे. तसेच विश्लेषणामध्ये विविध परस्पर संबंधित तक्त्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरणांची आखणी

१) प्रस्तावना

२) बुलढाणा जिल्ह्याची पार्श्वभूमी

३) संशोधन साहित्याचा आढावा

४) बचत गटातील सभासदांच्या सामाजिक - आर्थिक जीवनाचे स्वरूप

५) कोविड-१९ चा महिला व पुरूष बचत गटांवर झालेला परिणाम

६) निष्कर्ष आणि शिफारसी

संदर्भसूची :

१) Candace Nelson, Savings Groups at the Frontier

२) Jeffrey Ashe with Kyla jaggr Neilan, I Their Own Hand How Savings Groups Are Revolutionizing development.

३) बागल सुनिता (२००४): ‘ स्वयंसाहाय्य गट: आव्हाने व दिशा मिळून साऱ्याजणी, २००४

४) स्वयंसहाय्य गटांच्या खात्याची पुर्न:बाधणी २०१२

५) कामगिरी निकषाप्रमाणे स्वयंसहाय्य संघाचे वार्षिक नियोजन

६) देशमुख शुभदा (२००४): ‘ दशकभराचा अनुभव मिळून साऱ्याजणी, २००४

७) देवळी प. २०१२ : ‘बचतगट: आर्थिक स्थैर्य आणि महिला सबलीकरण’ योजना, वर्ष - ३१, अंक ०२

८) देवधर (२००७): ‘स्वयंसहाय्यता गट : एक अनुभवाधिष्ठित अभ्यास’, अर्थसंवाद, खंड-३१, अंक-०२.

९) कोठारी सुधा (२००४): ‘क्षितीजे विस्तारण्याची गरज मिळून साऱ्याजणी, २००४

१०) कुलकर्णी विजय फेब्रुवारी (२०१२) बचतगटाचा वाटाड्या, महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण महिला स्वयंसिध्द संघ चैतन्यसंस्था, राजगुरूनगर

११) कुलकर्णी वर्षा (२००५) बचतगट लढताहेत अत्याचारित स्त्रियांची लढाई अनुभव, २००५

१२) मोदी काजी के. (२०१३): ‘ग्रामीण महिलांच्या विकासात स्वयंसाहाय्यता गटाचे योगदान, कुरूक्षेत्र.

१३) मुलाणी एम. यु. (२००८) अल्प बचत नियोजन, डायमंड पब्लिकेशन.

१४) https://mr.m.wikipedia.org

१५) https://colorqdigital.com/bachat-gat-name-in-marathi/

१६) https://socialwelfare.vikaspedia.in/viewcontent/social-welfare/

संशोधक
नालंदा जंगलीमन वाकोडे

मार्गदर्शक
प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख,
बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, परभणी